# हायपोथायरॉडिझम

## हायपोथायरॉडिझम म्हणजे काय?

थायरॉईड ग्रंथीचे संप्रेरक कमी असण्याची स्थिती तेंव्हा येते जेंव्हा थायरॉईड ग्रंथी पुरेशा प्रमाणात तयार करत नाहीत. थायरॉईड संप्रेरके शरीराचे तापमान, हृदयाची स्पंदने , वाढ आणि वजन यावर नियंत्रण ठेवते.

## धोक्याची कारणे-

- शरीर स्वतःच्याच पेशीजालांना प्रतिद्रव्ये निर्माण करते. असे रोग जसे थायरॉईड ग्रंथींचा दाह किंवा हाशिमाटो डिसीज
- शस्त्रक्रिया, रेडिएशन उपचार किंवा औषधे जसे लिथियम, सिडेटिव्ह किंवा नारकोटीक
- थायरॉईडचा कर्करोग किंवा विषाणू संसर्ग
- आयोडिनचे प्रमाण कमी असणे

## चिन्हे आणि लक्षणे-

- कमालीचा थकवा
- थंडीस संवेदनशील
- डोकेदुखी किंवा एकाग्रता कमी होणे
- स्नायूत पेटके येणे आणि अशक्तपणा
- बध्दकोष्ठता
- कोरडी पोपडे निघालेली त्वचा आणि ठिसूळ नखे
- केस पातळ होणे
- अनियमित पाळी
- उदासिनता आणि चिडचिड

## निदान-

- थायरॉईड स्टिम्युलेटिंग हार्मोन (TSH)
- थायरॉईड हार्मोन्स संख्या (T3, T4) वाढते
- आयोडिन थायारॉईड स्कॅन

## उपचार-

- कमी असलेल्या थायरॉईड संप्रेरकास विस्थापित करणे.
- प्रचलित उपचारानुसार थायरॉइड संप्रेरके कमी प्रमाणात स्त्रवत असल्यास लिवोथायरॉक्झीन हे कृत्रिम संप्रेरक दररोज दिले जाते. तोंडावाटे घ्यावयाच्या या कृत्रिम संप्रेरकामुळे थायरॉईड संप्रेरकाची पातळी योग्य प्रमाणात राखली जाते. थायरॉइड संप्रेरकाच्या कमतरतेची लक्षणे नाहिशी होतात.




Thyroid supplements to make up for deficient hormones.

Routine testing to check the level of thyroid hormones in the bloodstream.

## रुग्ण समुपदेशन-

- महिला गर्भवती असल्यास किवा स्तनपान देत असल्यास किंवा रक्त साकळण्याच्या समस्या असल्यास, मधुमेह, हृदय आणि रक्तवाहिन्यांचे आजार असल्यास हृदयाच्या स्पंदनाच्या समस्या, हृदयविकार, हाडे ठिसूळ होणे, धोकादायक पंडूरोग, पिच्युटरी ग्रंथींच्या समस्या किंवा अँड्रेनल ग्रंथीच्या समस्या असल्यास डॉक्टरांच्या सल्ला घेऊनच उपचार करावे.
- या औषधामुळे हाडांचा -हास होऊ शकतो, त्याने हाडांचा ठिसूळपणा हा आजार उद्भावू शकतो.
- रुग्णांस मधुमेह असल्यास रक्तातील व लघवीतील शर्करेच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवावे.

Reference : Micromedex online solution .2.0.